# आशा-गीत

[ ओढणी व इतर कविता ]

बा. भा. पाठक
एम्. ए.

ऑगस्ट १९३३] [ किंमत १ रुपाया

# शिवराज आणि बालवीर

[ 'मी परत येईपर्यंत या शिवेवरून तूं कोणाही स्वारास जाऊं देऊं नकोस' ही शिवबापासून मोठ्या कष्टानें मिळविलेली कामगिरी सावळ्या बजावीत आहे.]

[ केशवकरणी. ]

**सावळ्याः**—खबरदार जर टाच मारुनी जाल पुढें, चिंधड्या
उडविन राइ राइ एवढ्या !
कुण्या गांवचे पाटिल आपण कुठे चालला असें
शीव ही ओलांडुनि तीरसे ?
लगाम खेचा हा घोडीचा राव टांग टाकुनी
असे या तुम्ही खड्या अंगणीं !
पोर म्हणूनी हसण्यावारी वेळ नका नेउं ही
मला कां ओळखलें हो तुम्ही ?
हा मर्द मराठ्याचा मी बच्चा असे,
हें हाडहि माझें लेचेपेचें नसे
या नसानसांतुन हिंमतबाजी वसे
खबरदार जर टांच मारुनी जाल पुढें, चिंधड्या
उडविन राइ राइ एवढ्या !

**स्वारः**— मळ्यांत जाउन मोटेचें तें पाणि धरावें तुवां
कशाला ताठा तुज हा हवा ?
मुठींत ज्याच्या मूठ असे ही खड्गाची तो बरें
वीर तूं समजलास काय रे ?
थोर मारसी अशा बढाया पराक्रमाच्या जरी
कुठे तव भाला बिरचा तरी ?
हें खड्गाचें बघ पातें किति चमकतें
अणकुचीदार अति भाल्याचें टोंक तें

यापुढें तुझी वद हिंमत कां राहते
खबरदार जर पाऊल पुढे टाकशील चिंधड्या—
उडविन राइ राइ एवढ्या
**सावळ्याः**— आपण मोठे दाढीवाले अहा वीर बायकी
किती ते आम्हाला ठाउकी !
तडफ आमुच्या शिवबाजीची तुम्हा माहिती न कां ?
दावितां फुशारकी कां फुका ?
तुम्हासारखे असतील किती लोळविले नरमणी
आमुच्या शिवबानें भररणीं
मी असे इमानी चेला त्यांचिकडे—
हुकमाविण त्यांच्या समजा याचेपुढे
देईन न जाऊं शूर वीर फाकडे.
पुन्हां सांगतो खबरदार जर जाल पुढें चिंधड्या
उडविन राइ राइ एवढ्या

× :: ×

लाल भडक तें वदन जाहलें बाळाचें मग कसें
(स्वार परि मनी हळूं कां हसे ?)
त्या बाळाच्या नयनीं चमके पाणी त्वेषामुळें
स्वार परि सौम्य दृष्टिनें खुले.
चंद्र दिसे एक जणूं दुसरा तपतो रवि का तर
ऐका शिवबाचे हे स्वर
आहेस इमानी माझा चेला खरा
चल इनाम घे हा माझा शेला तुला
पण बोल सावळ्या पुन्हां बोल एकदां
खबरदार जर टाच मारुनी जाल पुढे, चिंधड्या
उडविन राइ राइ एवढ्या !

४-११-२२

—